नमस्कार मंडळी,

बघता बघता २०१० चे वर्ष संपत आले आणि या वर्षीचा अहवाल लिहायची वेळ येऊन ठेपली. महाराष्ट्र मंडळाचे चार स्तंभ आहेत: कला, साहित्य, संस्कृती आणि समाज. या चारहि स्तंभांना धरूनच या वर्षीचे कार्यक्रम आणि उपक्रम आखण्यात आले. त्या कार्यक्रमांचा आणि उपक्रमांचा आढावा पुढील अहवालात घेतला आहे.

**कला:** परंपरेप्रमाणे या वर्षाची सुरुवात संक्रांतीला लहान मुलांच्या गुणदर्शनाने झाली. नाच-गाण्याच्या या कार्यक्रमाला नेहमीप्रमाणे आपल्या बालगोपालांनीच शोभा आणली. तसेच गणेशोत्सवातही स्थानिक कलाकारांनाच वाव देण्यात आला. तर दिवाळीला लॉस एंजेलिसमधील बहुसंख्य गायक, गायिका, वादक यांना घेऊन एक दर्जेदार कार्यक्रम करण्यात आला. स्थानिक कलाकारच नाही तर भारतातल्या कलाकारांचेसुद्धा लॉस एंजेलिस मध्ये कार्यक्रम झाले. त्यात प्रसिद्ध गायक **श्रीधर फडके** यांचा कार्यक्रम अरवाईनमधे तसेच प्रसिद्ध गायिका **राणी वर्मा** आणि प्रसिद्ध अभिनेत्री **वंदना गुप्ते** यांचा **'ती'** हा कार्यक्रम खास सिमी व्हॅलीच्या रसिकांसाठी करण्यात आला. चित्रपट प्रेमींसाठी या वर्षी दोन मराठी चित्रपटही दाखविण्यात आले: **"हरिश्चंद्राची फॅक्टरी"** आणि **"जेता"**. या चित्रपटांची मजा अनेक लोकांनी घेतली. या प्रमाणे सर्व कलांना या वर्षी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात आला.

**साहित्य:** मराठी साहित्याचे वितरण सोपं आणि लवकरात लवकर व्हावे म्हणून सुरु केलेला आमचा podcast **"मंथन"**चे या वर्षी १३ अंक प्रकाशित झाले. आपण मंथन मधल्या गोष्टी, कविता, लेख आणि मुलाखतींचा आस्वाद घेत असालच हि खात्री आहे. तसेच या वर्षी पासून मंडळाचे 'फिरते साहित्यालय' आता मराठी शाळेच्या शाखांबरोबर सुरु केलेले आहे. त्यामुळे लायब्ररीला चांगला प्रतिसाद मिळत आहे. मंडळाने नुकतेच ख्यातनाम **प्रोफेसर जयंत नारळीकर** यांचे व्याख्यान आयोजित केले होते. आपल्यापैकी अनेकांनी त्याला उपस्थित राहून चांगला प्रतिसाद दिला.

**संस्कृती:** मराठी संस्कृती जपण्यासाठी संक्रांत, होळी, गणेशोत्सव आणि दिवाळी असे विविध पारंपारिक कार्यक्रम करण्यात आले. सर्व कार्यक्रमाला सुंदर प्रतिसाद दिल्याबद्दल मंडळ तुमचे आभारी आहे. तसंच गणेशोत्सवाला देलेल्या देणगीमुळे या वर्षी देखील गणेशोत्सव अगदी थाटात करण्यात आला. कोठेही काटकसर न करता उत्तम कार्यक्रम करणे आम्हांला शक्य करून दिल्याबद्दल देणगिदारांचे आणि पुरस्कर्त्यांचे मनापासून धन्यवाद!

**समाज:** या वर्षी **"मार्ग"** आणि **"Professional Directory (PDS)"** असे दोन उपक्रम मंडळाने हाती घेतले आहेत. **"मार्ग"** हा ज्या लोकांना मदत हवी आहे आणि ज्या संस्था ही मदत पुरवू शकतात यांचा मधला सेतु आहे. अधिक माहितीसाठी कृपया ९४९-५२५- MMLA या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा. मराठी उद्योजकांचा मराठी समाजाशी परिचय करून देणे हेच **"Professional Directory"**चे उद्दिष्ट आहे. एरवी या उद्योजकांची माहिती आपल्याला एकमेकांकडुनच मिळते. या directory मध्ये नोंदणी केलेल्या उद्योजकांची माहिती आम्ही आपल्यापर्यंत मंडळाच्या संकेतस्थळ, ई-मेल आणि कार्यक्रमांमधुन उपलब्ध करुन देऊ.

लहान मुलांना मराठी शिकवण्यासाठी सुरु केलेल्या **मराठी शाळेच्या** शाखांमधुन किमान **१०० मुले** आज मराठी शिकत आहेत. मराठी शाळा इथपर्यंत आणण्याचे श्रेय मराठी शाळेच्या शिक्षकांना, स्वयंसेवकांना, देणगीदारांना, पालकांना आणि विद्यार्थांना जाते. या सर्वांचेच मंडळ आभारी आहे. या वर्षीही निसर्ग प्रेमिंसाठी आणि खास तरुण मंडळीसाठी कॅम्पिंगचा कार्यक्रम करण्यात आयोजित करण्यात आला. २००९ पासून सुरु झालेल्या या कार्यक्रमाला भरपूर प्रतिसाद मिळत आहे. जास्तीत जास्त लोकांना या कार्यक्रमाला येता येईल याचा पूर्ण प्रयत्न आम्ही करत राहू.

समाजसेवेत खारीचा वाटा उचलुन आपल्यापैकी बऱ्याच जणांनी दिलेल्या **$८९२** या रकमेमधे मंडळाच्या **$५००** ची भर घालुन ते **"हैती रिलीफ" फंडाला** देणगी म्हणुन दिले. तसेच गणेश-उत्सवात दानपेटी मधे गोळा झालेली **$१,१९४.५४** हि रक्कम **"प्रथम"** या संस्थेला देणगी म्हणून पाठवण्यात आली. तसेच या वर्षीपासून मंडळाची **inventory** कोणाच्या घरी नसून, अरवाईन मधल्या एका स्टोअरेजमध्ये ठेवली जाईल.

मंडळी आमच्या सर्व कार्यक्रमांना आणि उपक्रमांना उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल मंडळ आपले मनापासून आभारी आहे. २००९ पासून मंडळाच्या कार्यकारणीवर असलेले कार्यकर्ते या वर्षी निवृत्त होतील. आम्ही आशा करतो कि जसा प्रतिसाद, सहभाग आणि प्रेम तुम्ही आम्हांला दिलंत तसंच तुम्ही पुढील कार्यकारणीलाही द्याल!

**महाराष्ट्र मंडळ कार्यकारणी २०१०**

(आनंद सामंत, अक्षय अणावकर, अनिरुद्ध महिषी, अतुल केळकर, अमित गवते, दिनेश भिरुड, कुणाल कुलकर्णी, प्राजक्ता कुलकर्णी, कार्तिक गुप्ते, जान्हवी गुप्ते, मिलन भोसेकर, स्वाती देव, सुचेता कुचेकर, विशाल विभांडिक)